# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८.

**क्र.परीक्षा/विज्ञान निकाल कक्ष/६१८/२०१९**

## परिपत्रक:—

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन, महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वय व विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमाच्या CBSGS (75:25) मधील जुन्या विषयांचे (Old) ज्यांची ऑक्टोबर, २०१८ ही परीक्षेची अंतिम संधी देण्यात आली होती. सदर परीक्षेमध्ये काही विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यामुळे त्यांना दि. १९ मार्च, २०१९ रोजी झालेल्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये बाब क्र. ३ झालेल्या ठरावानुसार नवीन अभ्यासक्रमाशी समकक्ष (Equivalence) असलेला विषय देण्याबाबत तत्वत: निर्णय घेण्यात आला असून त्याची प्रक्रीया चालू आहे.

तरी प्रथम सत्र २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या CBSGS (75:25) मधील Old विषयांच्या संबंधीत विद्यार्थ्यांचे परीक्षा, परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षेचे अर्ज व समकक्ष विषयाबाबत लवकरात लवकर स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येईल. तरी सदर परीक्षेकरीता परीक्षा प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांनी भरलेले असले तरी विद्यार्थ्यांची परीक्षा स्वतंत्र घेण्यात येण्यात येईल.

स्वाक्षरीत/—

(डॉ.) विनोद पाटील
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक :— ०९ एप्रिल, २०१९

प्रत:—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक/संचालक